News of various events of Marathi Department

# पत्रकारांनी समाजातील अपप्रवृत्तींना रोखावे- प्रा. महाजन

**सिन्नर । प्रतिनिधी**

समाजातील अनिष्ठ प्रथांना पायबंद घालून सद्गुणांना समाजापुढे प्रकर्षाने आणण्याचे काम प्रसार माध्यमांचे असते. प्रसार माध्यमांनी ती भूमिका प्रामाणिकपणे पार पाडली तर पत्रकारांना कर्तव्यपूर्तीचे समाधान मिळते, असे मत दैनिक लक्ष महाराष्ट्रचे निवासी संपादक प्रा. जयंत महाजन यांनी व्यक्त केले.

सिन्नर तालुक्यातील पाटोळे येथे सिन्नर महाविद्यालयाच्यावतीने आयोजित विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलते होते. व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष विठ्ठलराजे उगले, प्रा. आर. के. मुंगसे, प्रा. एस. बी. कर्डक आदी उपस्थित होते. 'पत्रकारिता व समाज' या विषयावर बोलतांना प्रा. महाजन म्हणाले की, लोकशाहीचा चौथा खांब म्हणून पत्रकारितेकडे पाहिले जाते. त्यामुळे विध्वंसक पत्रकारिता करण्याऐवजी समाजाभिमुख पत्रकारिता केली तर नवनिर्माण होत असते. समाजातील दुर्लक्षित घटकांवर पत्रकारिता केंद्रीत झाली पाहिजे. समाजातील झाकोळलेल्या रत्नांना समाजाच्या पुढे आणले तर इतिहास निर्माण होत असतो. या समाजाला मदतीचा हात आपोआप मिळत असतो. यावेळी पत्रकारितेच्या क्षेत्रातील अनेक घटनांचे पैलू त्यांनी उलगडून दाखविले. नाशिकमध्ये नव्याने सुरू झालेल्या दैनिक लक्ष महाराष्ट्रची भूमिका त्यांनी यावेळी स्पष्ट केली. विद्यार्थ्यांना पत्रकारितेत येण्याचे आवाहन करून लक्ष महाराष्ट्र त्यांना मार्गदर्शन करण्याची भूमिका स्वीकारेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी प्रा. आर. के. मुंगसे यांचेही भाषण झाले.

यावेळी प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे, प्रा. एस. बी. कर्डक, प्रा. योगेश भारस्कर, प्रा. डॉ. सुरेखा जाधव, प्रा. एस. जी. भागवत, प्रा. आर. टी. सोनवणे, प्रा. श्रीमती आर. एस. आचट आदींनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




पुढारी

# जीवनात उत्तुंग यशासाठी मेहनत गरजेची; खातळे

**मुकणे : वार्ताहर**

परिस्थितीची कारणे न सांगता विद्यार्थ्यांनी जीवनात उत्तुंग ध्येयनिश्चिती करावी आणि ते साध्य करण्यासाठी तेवढीच मेहनत करावी, असे प्रतिपादन मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक भाऊसाहेब खातळे यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या वक्तृत्व स्पर्धेची केंद्रस्तरीय फेरी घोटी येथील जनता विद्यालय पार पडली. यावेळी १९ शाळांनी केंद्रस्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवला. मोबाइलचा नाद, वाचन- संवाद वाद, आई मला जन्म घेऊ दे, वसुंधरा वाचवा जीवन वाचवा, तुका चालला आकाशी, आनंदी शिक्षणाविषयी माझे विचार या विषयांवर विद्यार्थ्यांनी वक्तृत्व सादर केले. परीक्षक म्हणून इगतपुरी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. देवीदास गिरी, प्रा. आर. एम. आंबेकर यांनी काम पाहिले.

यावेळी विद्यार्थ्यांनी प्राभवी वक्तृत्वासाठी वाचन करणे गरजेचे असल्याचे प्रा. गिरी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. अंतिम स्पर्धेसाठी मोठ्या गटातून जनता विद्यालय नांदगाव येथील विद्यार्थिनी सुरेखा जालिंदर पागेरे आणि लहान गटातून जनता विद्यालय घोटी येथील विद्यार्थिनी शिवांजली धर्मराज आव्हाड यांची निवड करण्यात आली. यावेळी स्पर्धेचे बक्षीस वितरण शिक्षण समिती अध्यक्ष भाऊराव जाधव, घोटी विद्यालयाचे प्राचार्य एल. डी. आवारे, उपप्राचार्य एस. एम. लोहकरे, सी. बी. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

Nashik Gramin Edition
23 Dec, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

# एचपीटी कॉलेजमध्ये आयगेन स्पर्धा संपन्न



। नाशिक । वार्ताहर ।

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एच पी टी आणि आर वाय के कनिष्ठ महाविद्यालयात आय गेन वक्तृत्व स्पर्धेची आंतरमहाविद्यालयीन फेरी अत्यंत उत्साहात पार पडली. वक्तृत्व स्पर्धेत नाशिक विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील निवडलेल्या सदतीस विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

या स्पर्धेत मुग्धा थोरातने प्रथम, वेदिका काळेने द्वितीय, पूर्णिमा ठक्करने तृतीय, सिध्दी देशपांडेने चतुर्थ तर अस्मिता ठाकरेने पाचवा क्रमांक पटकावला.प्राचार्य व्ही एन सूर्यवंशी, केंद्रीय समन्वय समितीचे प्रा एच एल सबनीस यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांचे अभिनंदन केले.

उपप्राचार्य प्रा एस आर वर्मा, पर्यवेक्षक प्रा जे ए शेख, समन्वयक प्रा विष्णू उगले, एम सी व्ही सी समन्वयक प्रा सोमनाथ मुठाळ यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा देविदास गिरी, प्रा डॉ सायली आचार्य हे लाभले. सूत्रसंचालन प्रा एस बी भामरे व प्रा सौ आर एल सानप यांनी केले. परिचय प्रा सौ एस के बोरसे, तर आभार प्रदर्शन प्रा सौ एस एस बिन्हाडे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कार्यक्रम प्रमुख प्रा तृप्ती जाधव, प्रा सौ वसईकर, प्रा मृणाल अहिरे, प्रा सुनीता दोबडे, प्रा हुमेरा खान,प्रा सौ टोकसिया,प्रा सासे, प्रा गिरी यांनी उत्कृष्ट नियोजन केले.

सकाळ

# मातृभाषेवर प्रेम करायला शिका

## शिरीष गंधे : इगतपुरी महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

इगतपुरी, ता. २७ : मातृभाषेवर प्रेम करायला शिका, एकदा मातृभाषा आत्मसात केली, की जगातील कोणतीही भाषा अवघड नसते, असे प्रतिपादन निवृत्त प्रा. शिरीष गंधे यांनी केले. येथील केपीजी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. पी. आर. भाबड, उपप्राचार्य देवीदास गिरी, निवृत्त आगारप्रमुख अशोक हांडे, पी. जी. खळे आदी उपस्थित होते.

प्रा. गंधे म्हणाले, की आज सामाजिक बहिरेपणा समाजात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कोणी कोणाचे ऐकायला तयार नाही. अशावेळी संवाद महत्त्वाचा ठरतो. संवादातून लेखक, वाचक तयार होतात, त्यासाठी आपण मातृभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे. त्याचवेळी इतर भाषांविषयी आदरही बाळगला पाहिजे. प्रा. यू. एन. सांगळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. आर. एस. हिरे यांनी आभार मानले. प्रा. एस. डी. खैरनार, प्रा. आर. एम. आंबेकर, प्रा. एल. सी. देवरे, प्रा. व्ही. डी. दामले, प्रा. डी. के. भेरे, प्रा. डॉ. दत्तात्रेय वेलजाळी आदी उपस्थित होते.




**इगतपुरी : येथील महाविद्यालयात वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी संवाद साधताना प्रा. शिरीष गंधे. शेजारी प्राचार्य डॉ. पी. आर. भाबड, उपप्राचार्य प्रा. देवीदास गिरी, अशोक हांडे, प्रा. पी. जी. खळे, प्रा. यू. एन. सांगळे.**

Nashik, Nashik-Today
28/10/2019 Page No. 6

# काव्यवाचन स्पर्धा उत्साहात

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

इगतपुरी येथील मविप्र समाजाच्या कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात अमृतसागर शिक्षण संस्था, इगतपुरी पंचायत समिती व केपीजी महाविद्यालय मराठी वाङ्मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पावसाळी कविता' या विषयावरील काव्यवाचन स्पर्धा उत्साहात पार पडली.

विजेत्यांना चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. काव्यवाचन स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. दत्तात्रय वेलजाळी आणि प्रा. पी. जी. खळे यांनी काम पाहिले. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक पुंजाजी मालुंजकर, पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी प्रतिभा बरडे, शिक्षण विस्तार अधिकारी राजेंद्र नेरे, अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. पी. आर. भाबड उपस्थित होते. .

## विजेते विद्यार्थी

**इयत्ता सातवी ते आठवी गट :** प्रथम नम्रता दुभाषे (नित्यानंद इंग्लिश मीडियम स्कूल), द्वितीय संस्कृती शिंगोटे (जि. प. प्राथमिक शाळा)

**इयत्ता नववी ते दहावी गट :** प्रथम दिव्या आंधळे (जनता विद्यालय, घोटी), द्वितीय अक्षरा घोडे (आदर्श कन्या विद्यालय, घोटी)

**इयत्ता अकरावी ते बारावी गट :** प्रथम रोहिणी चौधरी (केपीजी महाविद्यालय, इगतपुरी), द्वितीय शिवानी घारे (डी. एन. लहाने महाविद्यालय, टाके घोटी).



# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत ग्रंथप्रदर्शन

इगतपुरी : येथील कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. याअंतर्गत ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. आर. भाबड यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी मराठी भाषा आणि साहित्याविषयी मार्गदर्शन केले. प्रदर्शनात विविध लेखकांच्या कथा, कादंबऱ्या, चरित्रे, कवितासंग्रह, नाटके यांबरोबरच स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त असणाऱ्या विविध प्रकाशनांची संदर्भ पुस्तके ठेवण्यात आली होती. मराठी विभागप्रमुख व देवीदास गिरी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून या ग्रंथप्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. याप्रसंगी दत्तात्रय वेलजाळी, ए.ए. पोटे, यू. एन.सांगळे, डी. के. भेरे, परदेशी, गायकवाड, लायरे आदीसह विद्यार्थी उपस्थित होते.

# सत्यशोधक चळवळीनेच समाजजागृती

## अभिमन्यू सूर्यवंशी : कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने यांना इगतपुरीत अभिवादन

**सकाळ वृत्तसेवा**

इगतपुरी, ता. ३ : कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने यांनी सत्यशोधक चळवळ अंगीकारून आदिवासी पाडे तसेच गावोगावी जाऊन समाजजागृती केली. ब्रिटिश राजवटीतील त्यांचा भातलढा शेतकऱ्यांना हक्क मिळून देणारा ठरला, असे अभिमन्यू सूर्यवंशी यांनी शनिवारी (ता. ३) येथे सांगितले. कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात शनिवारी कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने यांचा जयंती कार्यक्रम झाला. त्या वेळी ते बोलत होते. मराठा विद्याप्रसारक समाज संस्थे संचालक भाऊसाहेब खातळे, वसंत गोवर्धने, प्रा. अशोक सोनवणे, शिवराम झोले, कचरू शिंदे, शांताराम कोकणे, विजय कडलग, अशोक गोवर्धने, प्राचार्य डॉ. पी. आर. भाबड आदी उपस्थित होते.



**इगतपुरी : महाविद्यालयात कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने जयंती कार्यक्रमात शनिवारी मार्गदर्शन करताना मविप्रचे संचालक भाऊसाहेब खातळे. शेजारी अभिमन्यू सूर्यवंशी, शिवराम झोले, कचरू शिंदे, शांताराम कोकणे, प्रा. अशोक सोनवणे, प्राचार्य डॉ. पी. आर. भाबड आदी.**

प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त रक्तदान शिबिरही झाले. अध्यक्षीय भाषणात भाऊसाहेब खातळे यांनी कर्मवीरांचे आदर्श घेऊन समाजात जीवन जगणारे किती लोक आहे, ही संशोधनाची बाब ठरू शकते. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची हुशारी ही केवळ आर्थिक हलाखीच्या परिस्थितीमुळे बळी पडत आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

वसंत गोवर्धने म्हणाले, की पुंजाबाबा गोवर्धने यांची जयंती दर वर्षी साजरी होते, याचा अभिमान आहे. प्रा. अशोक सोनवणे यांनी बाबांचे राजकारण तत्त्वाधिष्ठित होते, तसेच शिक्षणमूल्याबरोबरच समाजमूल्य आत्मसात केल्यास व्यक्तिमत्त्व घडते. बाबांचा भातलढा विद्यार्थ्यांना आदर्श प्रेरणा देणारा आहे, असे सांगितले. कार्तिक गिळंदे याने मनोगत व्यक्त केले. रोहिदास उगले, जयवंत गोवर्धने, सुनील रोकडे, वैशाली आडके, बाळासाहेब वालझाडे, सागर बरे, प्रशांत गोवर्धने, उत्तम गोवर्धने, सुमन गोवर्धने, वृषाली गोवर्धने, समाधान जाधव आदी उपस्थित होते. उपप्राचार्य प्रा. देवीदास गिरी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. यू. एन. सांगळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आर. एम. आंबेकर यांनी आभार मानले.

सकाळ

# इगतपुरी तालुका साहित्य मंडळाचे पुरस्कार जाहीर

## प्रा. गिरी यांना सर्वतीर्थ, पगारे यांना ज्ञानदूत पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**



प्रा. गिरी



विजय पगारे

वाडीवऱ्हे, ता. १७ : तालुका ग्रामीण साहित्य मंडळातर्फे दिले जाणारे पुरस्कार मंडळाचे अध्यक्ष साहित्यिक पुंजाजी मालुंजकर यांनी जाहीर केले आहेत. यात सर्वतीर्थ पुरस्कार इगतपुरी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. देवीदास गिरी यांना, तर ज्ञानदूत पुरस्कार 'सकाळ'चे इगतपुरी तालुका बातमीदार व प्राथमिक शिक्षक विजय पगारे यांना जाहीर झाला.

अन्य पुरस्कारांमध्ये जीवनगौरव पुरस्कार सचिन सोनवणे, सामाजिक कृतज्ञता पुरस्कार रोहिदास महाराज मते, ज्ञानसाधना पुरस्कार प्रा. डॉ. जास्वंदी मोजाड-कदम, कलारत्न पुरस्कार राजेंद्र उगले, काव्यरत्न पुरस्कार कवी संजय कान्हव यांना जाहीर झाला आहे. याबरोबरच सहस्रबाहू दिवाळी अंकातर्फे विविध वाङ्मय पुरस्कार ही जाहीर करण्यात आले आहेत. यात कथालेखनासाठी शारदा गायकवाड, दत्तात्रेय झनकर, विकास ननावरे, काव्यलेखनासाठी लता पवार, शिवाजी क्षीरसागर, शिवाजी पगारे, ललित लेखनासाठी अलका कुलकर्णी, दिनेश चव्हाण, रवींद्र दळवी, तर अक्षरदूत पुरस्कार प्रा. पुंडलिक गवांदे, कवी दिलीप पाटील, कवी रूपचंद डगळे यांना देण्यात येणार आहेत. पुरस्कारांचे वितरण वाडीवऱ्हे येथे होणाऱ्या ग्रामीण साहित्य संमेलनात शनिवार (ता. २३) मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. साहित्य संमेलनाला उपस्थित राहावे, असे आवाहन साहित्य मंडळ व सहस्रबाहू प्रकाशनातर्फे व साहित्य मंडळाचे अध्यक्ष साहित्यिक मालुंजकर यांनी केले.

Nashik, Nashik-Today
18/02/2019 Page No. 2

## Photos of Various activities conducted by Marathi department




Editor Prof. Jayant Mahajan addressing on occasion of press day.




On accout of Elocution Competition MVP Director Shri. Bhausaheb Khatale addressing.




With the winners of Elocution Competition organised by HPT college judge Prof. D.N Giri.




On occasion of samaj din Ex- Principal Dr. P.S. Pawar adressing in presence of Prin Dr. P.R. Bhabad and Director Shri. Bhausaheb Khatale.



Book Exhibition organised on account of Vachan Prerna Din.




Students taking a glance at books on Vachan Prerna Din.

Last modified: 13:12